नि. फौजदारी खटला क्र. ३१/२०२३

महाराष्ट्र शासन/ गोकुळ

निशाणी क्र. ३२

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ ची जबानी शपथेवर सुरू...</u>**

**मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपूर्ण खरे सांगेन व ख–याशिवाय काहीही सांगणार नाही.**

**साक्षीदाराचे नाव : सर्जेराव श्रीहरी महाजन**

**वय** : ५२ वर्षे,

**व्यवसाय** : शेती

**पत्ता** : नागझरवाडी, ता. कळंब, जि. धाराशिव.

**<u>साक्षीदार क्र.२ चा सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एस.टी. वैद्य यांचे मार्फत</u>**

१. दि.१६/११/२०२२ रोजी पो.स्टे. शिराढोण यांनी मला पंचनाम्याकरीता बोलावले नव्हते. पोलीसांनी माझी मी शेतात जात असताना फिर्यादी यांचे घरासमोरून जात असताना पोलीस पाटील यांनी मला बोलावून माझी सही घेतली. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र. १ वरती माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. सदर सहीस निशाणी क्र. ३३ देण्यात येतो.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१६/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता पोलीसांनी मला व दुसरा पंच पोपट गांधले यांना फिर्यादीचे घरासमोर पंचनाम्याकरीता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनामा वाचून दाखवून त्यावर आमच्या सहया घेतल्या. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे माझे गावचे रहिवासी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे ओळखीचे व गावातील असल्यामुळे त्यांचे सांगण्यावरुन त्यांना वाचविण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. ए. सी. चोंदे यांनी नाकारला.</u>**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

**स्वाक्षरीत/–**

**दिनांक:** ०१/११/२०२५ **(अमृता डी. जाधव)**
**ठिकाण:** कळंब न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,
(कोर्ट क्र.३)कळंब.